**महाराष्ट्र विधानसभा**
**पहिले अधिवेशन, २०२६**

-----------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ०६ मार्च, २०२६ / फाल्गुन १५, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्ये मंत्री** | |
| **(३)** | **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री** | |
| **(४)** | **शालेय शिक्षण मंत्री** | |
| **(५)** | **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** | |
| **(६)** | **पणन, राजशिष्टाचार मंत्री** | |
| **(७)** | **वस्त्रोद्योग मंत्री** | |
| **(८)** | **सहकार मंत्री** | |

-----------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**

-----------------------------

**जी.डी. आर्ट पदविका अभ्यासक्रमासाठी "कला फाऊंडेशन" अभ्यासक्रमाची अट रद्द केल्याबाबत**

**(१) * २४२१६ श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार जी.डी. आर्ट पदविका अभ्यासक्रमासाठी वर्षानुवर्षे बंधनकारक असलेली 'कला फाऊंडेशन' अभ्यासक्रम पूर्ण करण्याची अट काढून टाकण्याचा संबंधित विभागाने निर्णय घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे राज्यभरातून कला फाऊंडेशन पूर्ण केलेल्या हजारो विद्यार्थ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जी.डी. आर्ट पदविकेच्या नव्या पात्रता निकषांना विद्यार्थ्यांकडून विरोध होत असल्याने या निर्णयाबाबत फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

"कला फाऊंडेशन" अभ्यासक्रमाचे स्वरुप बदलून वर्ष २०२५-२०२६ पासून महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाने फाऊंडेशन सर्टीफीकेट इन आर्ट ॲन्ड डिझाईन हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु केला आहे.

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत नॅशनल क्रेडीट फ्रेमवर्क (NCrF २०२३) चे तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश पात्रतेबाबतचे निकष विचारात घेऊन महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाशी संलग्न पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाची पात्रता १० / एस.एस.सी. विहीत करण्यात आली आहे.

फाऊंडेशन सर्टीफीकेट इन आर्ट ॲन्ड डिझाईन कोर्स पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदविकेच्या द्वितीय वर्षात थेट समांतर प्रवेश देण्याची तजवीज ठेवली आहे.

(२) व (३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अग्निवीरांसाठी स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२) * २६९६१ श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.तुकाराम काते (चेंबूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **माजी सैनिक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अग्निवीर योजनेंतर्गत चार वर्षे भारतीय सैन्यदल, नौदल व हवाई दलातसेवा पूर्ण केल्यानंतर ७५ टक्के जवानांसमोर बेरोजगारीचा प्रश्न निर्माण होतो, यासाठी त्यांना शासनाच्या सेवेत सामावून घेण्याची तयारी सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अग्निवीरांसाठी राज्य सरकारच्या धोरणानुसार कोणत्या प्रकारच्या शासकीय व अर्धशासकीय सेवेत त्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे,

(३) असल्यास, राज्यातील अग्निवीरांसाठी स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशिक्षण, सहाय्यता योजना अंमलात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराजे देसाई :** (१), (२) व (३) शासन निर्णय दि.०६.०१.२०२६ अन्वये सैन्य दलातून अग्निवीर म्हणून सेवा समाप्तीनंतर त्यांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करण्यासंदर्भात उपाययोजना सुचविण्याकरिता अभ्यास गट गठीत करण्यात आला आहे. सदर अभ्यासगटास तीन महिन्यात अहवाल सादर करण्याचे निर्देशित करण्यात आले असून सदर अहवाल अद्याप शासनास सादर केलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अंबरनाथ (जि. ठाणे) येथील खाजगी शाळेच्या व्हॅनमधून विद्यार्थ्यांचा अपघात झाल्याबाबत**

**(३) * २५३३० श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील एका खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या भरधाव वेगाने जाणाऱ्या व्हॅनमधून नर्सरी वर्गातील दोन विद्यार्थी रस्त्यावर पडल्याची घटना दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्हॅनमध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी बसलेले असल्यामुळे मागचा दरवाजा उघडला गेल्यामुळे सदर दुर्घटना घडली असून विद्यार्थी जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी रिक्षा, व्हॅन अथवा इतर वाहनांमधून वाहतूक करण्यास शासनाने बंदी घातलेली असताना सदर प्रकरणात नियमांचे उल्लंघन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने व्हॅनमध्ये नेमण्यात आलेल्या केअरटेकरविरुद्ध तसेच संबंधित शाळा व्यवस्थापनाविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी शासनाने कोणती प्रतिबंधात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
सदर शाळेतील दोन विद्यार्थी खाजगी भरधाव जाणाऱ्या व्हॅनमधून रस्त्यावर पडल्याची घटना दिनांक ७ जुलै, २०२५ रोजी सकाळी घडली आहे सदर अपघातात नर्सरी वर्गातील दोन विद्यार्थी हे पडून जखमी झाले आहेत.
(३), (४) व (५) हे खरे आहे.
सदर वाहन हे अपघातग्रस्त विद्यार्थ्यांच्या पालकांनी स्वजबाबदारीने खाजगी भाडेतत्वावर नेमले असल्याने व्हॅन वाहनचालक व केअरटेकर यांचे विरोधात पालकांमार्फत ६२२/२०२५ भा.न्या.सं कलम २८१, १२५ (क) (अ) सह.पो.वा.का कलम १३४ (अ) (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(६) खाजगी बसद्वारे होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वाहतुकीबाबत शासन अधिसुचना दिनांक २२ मार्च २०११, शासन निर्णय दिनांक १८ नोव्हेंबर, २०१३ तसेच शासन निर्णय दिनांक १८ मार्च, २०१६ अन्वये विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकी संदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत.

----------------

## बेंबळा (जि.यवतमाळ) सिंचन प्रकल्पातील कालव्याचे काम मिळविण्यासाठी बनावट अनुभव प्रमाणपत्र सादर केल्याबाबत

**(४) * २६०६४ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेंबळा (जि.यवतमाळ) सिंचन प्रकल्पातील मुख्य कालव्याचे काम मिळविण्यासाठी कंत्राटदार श्री.सुमित बाजोरिया, श्री.सतीश भोयर व श्री.अभयकुमार एन यांनी अनुक्रमे रुपये २ कोटी ६४ लाख आणि रुपये ३ कोटी ६४ लाखांच्या कामांसाठी बनावट अनुभव प्रमाणपत्र सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी उच्च न्यायालयाच्या आदेशावरून एसीबीच्या माध्यमातून चौकशी सुरू करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी संबंधित कंत्राटदारांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अंशत: हे खरे आहे.

बेंबळा मुख्य कालवा कि.मी. ८५ व ८६ मधील मातीकाम व बांधकाम, करारनामा क्र.ब-१/२/डि.एल./२००७-०८ दिनांक १२ एप्रिल, २००७ नुसार रु. ३ कोटी ६४ लक्ष चे काम कंत्राटदार श्री. सतीश भोयर व श्री.अभयकुमार एन. (जे.व्हि) यांना देण्यात आले होते. सदर कामाचा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ यांचेकडून तपास चालू आहे.

तसेच बेंबळा मुख्य कालवा कि.मी. १०१ व १०२ मधील मातीकाम व बांधकाम, करारनामा क्र.ब-१/७/डि.एल./२००८-०९ दि.१७.०६.२००८ नुसार श्री.सुमित बाजोरीया ॲन्ड जे.व्ही यांना (करारनामा किंमत रु.५ कोटी ३९ लक्ष) देण्यात आले होते. सदर कामाचे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ यांचेकडून तपास चालू आहे.
(२) सदर दोन्ही प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ यांचेकडून तपास चालू आहे.
(३) सदर प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ यांचेकडून तपास चालू असून चौकशी अंतिम झाल्यानंतर सक्षम स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुसावळ (जि. जळगाव) तालुक्यातील पी. के. कोटेचा महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींकडून जादा शुल्क आकारल्याबाबत

**(५) * २७२०० श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ (जि. जळगाव) तालुक्यातील पी. के. कोटेचा महिला महाविद्यालयामध्ये गेल्या दहा ते बारा वर्षांच्या कालावधीत विद्यार्थिनींकडून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने प्रस्तावित व मंजूर केलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठाची पूर्वमंजुरी नसताना पॉवर चार्जेस, कॉम्प्युटर लॅब शुल्क व इतर उपक्रम शुल्क विद्यार्थिनींकडून आकारण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयास जादा आकारण्यात आलेली शुल्क तसेच दंडाची रक्कम त्वरित विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण निधीत जमा करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, संबंधित महाविद्यालयाकडून जादा शुल्क व दंडाची रक्कम जमा करून ती विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण निधीत जमा करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरणी विद्यापीठाने समिती गठित केली होती. समितीने जमा झालेल्या रकमेच्या १०% टक्के दंड सदर महाविद्यालयास आकारण्यात यावा तसेच सदर दंडाची रक्कम "विद्यार्थी विकास निधीच्या" खात्यात जमा करावी अशी शिफारस केली आहे.

-----------------

### मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ केंद्रातून सरकी पेंड व गोण्यांचा अपहार झाल्याबाबत

**(६) * २४७२३ श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ केंद्रातून सुमारे २० लाख ६ हजार ६८० रुपये किमतीच्या सरकी पेंड आणि खताच्या गोण्यांचा अपहार झाल्याची घटना माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी तत्कालीन साठा अधीक्षकावर गुन्हा दाखल होऊन नऊ महिने उलटले तरी वखार महामंडळाच्या वरिष्ठ पातळीवरून कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये केंद्राच्या गेटला टाळे ठोकून कामकाज बंद पाडले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांनी खाजगी सावकारांकडून कर्ज काढून साठवलेल्या मालाचा अपहार झाल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले असून शासकीय गोदामातून मालाची विल्हेवाट लावली जाणे ही बाब प्रशासकीय नियमांचे उल्लंघन करणारी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकारणाची चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने पीडित शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची नुकसान भरपाई देण्यासह भविष्यात अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अशंतः खरे आहे.

मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ केंद्रातून सरकी पेंड आणि खताच्या गोण्यांचा अपहार झाल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२) हे अशंतः खरे आहे.

तीन ठेवीदारांनी मंगळवेढा वखार केंद्राच्या गेटला टाळे ठोकून कामकाज बंद पाडल्याने महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ वखार केंद्रास भेट देऊन पोलीस प्रशासन व महामंडळ सदर प्रकरणी करत असलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती दिली व त्यानंतर वखार केंद्र पूर्ववत सुरू झाले आहे.

(३) हे अशंतः खरे आहे.

ठेवीदारांनी राजमाता अर्बन को-ऑप बँक लि. व यशोदा महिला नागरी सहकारी पतसंस्था या संस्थांकडून शेतमाल वखार पावती तारण कर्ज घेतलेले दिसून येत आहे.

वखार महामंडळाच्या कर्चाऱ्यांनी केलेल्या अपहाराच्या नुकसान भरपाई प्राप्तीस्तव महामंडळ राष्ट्रीयीकृत विमा कंपनीकडून विमा पॉलिसी घेते. अपहारामुळे महामंडळाचे व ठेवीदारांचे नुकसान झालेले नाही.

(४) होय.

(५) अपहारप्रकरणी महामंडळाने दाखल केलेला विमा दावा मंजूर झाला आहे. सदर प्रकरणी अपहार झालेल्या साठ्याची वखार पावतीनुसारची रक्कम रू. २०,०६,६८०/- असून संबंधित साठ्याचे वखार साठवणूक भाडे रक्कम रू.१,७१,८०५/- आहे. सदरबाबत नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यासाठी संबंधित बँक व पतसंस्था यांना आवश्यक माहिती सादर करण्याकरिता दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ नुसार कळविण्यात आले आहे. माहिती प्राप्त झाल्यानंतर रक्कम अदायगीची कार्यवाही करण्यात येईल.

मंगळवेढा वखार केंद्रातील अपहार उघडकीस आल्यानंतर वखार महामंडळाने दोषी कर्मचारी यांना दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२४ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच, तपासणीअंती त्यांच्याविरुद्ध पोलिस स्टेशन, मंगळवेढा येथे गुन्हा नोंद क्र. १९३, दिनांक १८ मार्च, २०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. दोषी कर्मचाऱ्याविरूद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यात येऊन रक्कम वसुलीचे आदेश पारित केले आहेत व दोषी कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधीची महामंडळाची वर्गणी वसूल केली आहे. तसेच, सदर आदेशान्वये यापुढे दोषी कर्मचारी यांना देय होणाऱ्या तीन वर्षाची वार्षिक वेतनवाढ त्यापुढील वेतनवाढीवरील परिणामांसह, कायमस्वरुपी रोखण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कोविड-१९ महामारीत पालक गमावलेल्या मुलांना मोफत शिक्षणाचा लाभ देण्याबाबत

**(७) * २८६४५ श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड-१९ महामारीदरम्यान अनेक विद्यार्थ्यांनी पालक गमावल्याने त्यांच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विधवा मातांना आपल्या पाल्यांचे शिक्षण सुरू ठेवताना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सन २०१९-२० पासून कोविड-१९ आजारामुळे वडील किंवा पालकांचा मृत्यू झालेल्या निराधार महिलांच्या मुलांना / पाल्यांना शालेय शिक्षणाचा खंड पडू नये यासाठी RTE कायद्यान्वये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मोफत शिक्षणाचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर धोरणात्मक निर्णयाची राज्यात प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अनुसार दुर्बल व वंचित घटकातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकास नजिकच्या शाळेत इ. १ ली ते इ. ८ वी पर्यंतचे मोफत शिक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार, खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेश स्तरावर २५ टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात.

महाराष्ट्र बालकांचा मोफत शिक्षणाचा हक्क नियम, २०१३ मध्ये केलेल्या सुधारणांनुसार आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेश प्रक्रियेमध्ये अनाथ बालक व कोव्हीड प्रभावित बालक (ज्याचे पालक एक किंवा दोन्ही यांचे निधन दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते ३१ मार्च, २०२२ या कालावधीत कोविड प्रादुर्भावामुळे झाले) यांचा दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार समावेश करण्यात आला आहे.

तसेच, शासन निर्णय, दिनांक १३ जून, १९९६ अन्वये मान्यताप्राप्त अनुदानित शाळांमध्ये १० वी पर्यंतचे शिक्षण मोफत दिले जात असते. तर, शासन निर्णय, दिनांक ०६ फेब्रुवारी, १९८७ अन्वये मान्यताप्राप्त अनुदानित शाळांमध्ये इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षण मोफत दिले जात असते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## गोंदिया जिल्ह्यातील युवक कल्याणकारी योजनेंतर्गत ‘अतुल्य शिक्षक फाउंडेशन’ कडून झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत

**(८) * २३०१४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा क्रीडा विभागामार्फत नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत सन २०२४-२०२५ मध्ये युवक कल्याणकारी कार्यक्रमांतर्गत अतुल्य शिक्षक फाउंडेशनमार्फत स्पर्धा परीक्षा कार्यशाळा, आरोग्य विषयक मार्गदर्शन कार्यशाळा व कायदेशीर मार्गदर्शन शिबिरे जिल्ह्यातील सात महाविद्यालयांमध्ये आयोजित केल्याचे कागदोपत्री दाखविण्यात आले असून प्रत्यक्षात सुमारे १९,७४३ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले नसल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्ष प्रशिक्षण न देता सदर संस्थेस सुमारे रुपये १ कोटी २५ लाख इतकी देयके अदा करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळलेल्या अधिकारी/संस्थेविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा अजित पवार :** (१) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, गोंदिया यांचे आदेशान्वये जिल्हा नियोजन समिती, गोंदिया च्या नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत सन २०२४- २५ साठी युवक कल्याणकारी कार्यक्रमांतर्गत अतुल्य शिक्षक फाउंडेशन मार्फत स्पर्धा परीक्षा कार्यशाळा, आरोग्य मार्गदर्शन कार्यशाळा व कायदेशीर मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) जिल्हा नियोजन समिती, गोंदिया च्या नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत सन २०२४-२५ कार्यक्रमांतर्गत ६० महाविद्यालयांतील १९,७४३ विद्यार्थी प्रशिक्षणासाठी नियोजित असून, त्यासाठी रु.१.२५ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे.

(३) जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी पत्र क्र. जिनिस/जिवायो/संसंअ/१/२०२५/१०८७, दिनांक ३० डिसेंबर, २०२५ पत्रान्वये उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

(४) जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी नियुक्त केलेल्या चौकशी समितीचा अहवाल अप्राप्त असून पुढील कार्यवाही त्यांच्या कडून अपेक्षित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील विलंब व त्रुटींबाबत

**(९) * २३९४५ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे मे, २०२५ मध्ये तांत्रिक अडचणींमुळे विस्कळीत झालेली इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया मुंबईसह राज्यभरात अकरावीची वार्षिक परीक्षा केवळ दीड महिन्यावर आलेली असताना देखील अद्याप सुरू असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २० डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या प्रवेश फेरीत सुमारे ३८० हून अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश न मिळाल्यामुळे त्यांच्या नियमित अभ्यासावर विपरीत परिणाम होत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया उशिरा सुरू झाल्याने तसेच योग्य नियोजनाच्या अभावामुळे प्रवेश नियमांचे उल्लंघन होऊन विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक वर्ष धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भविष्यात अशा प्रकारच्या अडचणी टाळण्यासाठी शासन प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी १५ ते ३० दिवस आधी आवश्यक कागदपत्रांची यादी जाहीर करणे, तसेच मुख्याध्यापक, वर्गशिक्षक व कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य यांचे फेब्रुवारी-मार्च महिन्यात पूर्वतयारी व प्रशिक्षण घेण्याबाबत आवश्यक सुधारणा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रवेश प्रक्रियेतील त्रुटींमुळे ज्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे अशा विद्यार्थ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

दिनांक २० डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या फेरीतील ३६६ विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेमध्ये अर्ज सादर करताना प्रवेश अर्ज स्वतः लॉक न केल्यामुळे त्यांना कनिष्ठ महाविद्यालय अलॉट झालेले नाहीत व त्यामुळे सदर विद्यार्थी प्रवेशा पासून वंचित राहीले होते. परंतु या विद्यार्थ्यांसाठी ११ वी इयत्तेची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात येऊन त्यांना प्रवेश देण्यात आला आहे. उशीरा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या बाबतीत अभ्यासक्रम पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी ही संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान झालेले नाही.

(४) सन २०२६-२०२७ मधील ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया नियमित व विहीत कालावधीत पार पाडण्यासाठी कागदपत्रांची यादी जाहीर करणे, शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाची नोंदणी करणे, विद्यार्थ्यांचे प्रोफाईल तयार करणे व इतर आनुषंगिक बाबींसाठी वेळापत्रक जाहिर करण्यात येणार आहे.

तसेच पुढील वर्षाच्या ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या सुसुत्रिकरणासाठी व प्रभावी अंमलबजावणीसाठी नवीन मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारदरा धरणावर (जि.अहिल्यानगर) शताब्दी वर्षानिमित्त जागतिक पर्यटन स्थळे विकसित करण्याबाबत

**(१०) * २५१७५ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारदरा धरणावर (जि.अहिल्यानगर) शताब्दी वर्षात जागतिक पर्यटन स्थळे विकसित करण्याच्या दृष्टीने सर्व समावेशक पर्यटन विकास आराखडा त्वरित करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी प्रशासनाला माहे डिसेंबर, २०२५ मध्ये दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारदरा धरणाच्या शताब्दी वर्षानिमित्त करावयाची उपाययोजना व पर्यटन विकास आराखड्याचा आढावा घेण्यासाठी निळवंडे धरण विश्रामगृहात नुकतीच बैठक आयोजित करण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भंडारदरा धरणाचे हे शताब्दी वर्ष केवळ उत्सवापुरते मर्यादित न राहता या वर्षात धरण शाश्वत व जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाले पाहिजे या जुन्या ब्रिटिशकालीन वास्तूचे जतन, वॉटर म्युझियम आणि स्थानिकांना रोजगार आदी बाबींचा आराखड्यात समावेश असावा असे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डॅम रिहॅबिलिटेशन इम्प्रूमेंट प्रोजेक्ट (DRIP) अंतर्गत निधी व शासनाचा विशेष निधी वापरून कामे केली जातील या नियोजनासाठी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून यामध्ये जलसंपदा विभाग, वन विभाग व एमटीडीसी यांनी समन्वय साधून पंधरा दिवसात मास्टर प्लॅन तयार करून त्याचे सादरीकरण करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जलसंपदा विभागाने धरण परिसरातील अतिक्रमण हटवून १७ ते १८ हेक्टर जागा उपलब्ध केली असल्याने या जागेवर पर्यटनाचे प्रकल्प उभारण्यात येत असल्याने स्थानिक तरुणांना रोजगार मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, भंडारदरा धरण शताब्दी वर्षानिमित्त पर्यटन विकास आराखडा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

भंडारदरा धरणाच्या शताब्दी वर्षानिमित्त करावयाची उपाययोजना व पर्यटन विकास आराखड्याचा आढावा घेण्यासाठी निळवंडे धरण विश्रामगृहात दिनांक २२ डिसेंबर, २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

(३) हे खरे आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प (DRIP) अंतर्गत फक्त भंडारदरा धरणाच्या मजबुतीकरणाचे काम समाविष्ट असून सदर काम सुरु करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

शताब्दी महोत्सवासाठी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत असून सदर समितीच्या मार्गदर्शन व निर्देशान्वये शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने कामे करण्यात येणार आहेत.

(५) हे अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभागाने धरण परिसरातील अतिक्रमण केलेल्या क्षेत्राची मोजणी भूमी अभिलेख कार्यालयामार्फत केली आहे व हद्दनिश्चितीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदर हद्दनिश्चिती प्रक्रिया पूर्ण करुन व अतिक्रमण हटवून १७ ते १८ हेक्टर जागा उपलब्ध करून या जागेवर पर्यटनाचे प्रकल्प उभारण्यात येत असल्याने स्थानिक तरुणांना रोजगार मिळणार आहे.

(६) भंडारदरा धरण शताब्दी वर्षाचा आराखडा तयार करण्याबाबत मा.मंत्री, (जलसंपदा) (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांनी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर कार्यालय यांना पर्यटन तज्ज्ञांची नेमणूक करण्याबाबत निर्देश दिले आहेत.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या उच्चाधिकार समितीबाबत

**(११) * २९३५६ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी आणि कर्जमाफीचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या उच्चाधिकार समितीची स्थापना करून सुमारे अडीच महिने होवून देखील अद्याप कोणतीही अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कालावधीत समितीने कर्जमाफीचे निकष निश्चित न करणे, फक्त बँकांना सूचना दिल्या असल्याने शेतकऱ्यांच्या थकीत कर्जांची माहिती गोळा करणे, पुनर्गठन किंवा माफीचा आराखडा तयार करण्याबाबत प्रगती दिसत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकरी अजूनही कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले आहेत, कर्जमाफीची आशा भंग होत आहे व शेतकरी आत्महत्यांची समस्या राज्यापुढे दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कर्जमाफीसाठी नेमलेल्या उच्चाधिकार समितीच्या अंमलबजावणीबाबत आणि शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) ते (३) नाही.

राज्यातील शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांची शिफारस शासनास करण्यासाठी दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चाधिकार समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या अभ्यासासाठी राज्यातील बँकांमार्फत शेतकऱ्यांना दिलेल्या थकीत कृषी कर्जांची व मागील पाच वर्षामध्ये पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कर्जाची माहिती बँकांकडून मागविण्यात आली आहे. त्यानुसार बँकांकडील सुमारे ५४.६३ लाख थकीत कर्ज खात्यांपैकी ५२.८० लाख कर्ज खात्यांची माहिती समितीस सादर करण्यात आली आहे. सदर माहितीचे महाआयटी या संस्थेच्या सहाय्याने संगणकीय संस्करण तथा विश्लेषण उच्चाधिकार समितीमार्फत करण्याची कार्यवाही सुरु असून या संस्करणानंतर समितीकडून उपाययोजना / शिफारशी शासनास सादर करण्यात येणार आहेत.
(४) उच्चाधिकार समितीच्या शिफारशी प्राप्त झाल्यानंतर सदर शिफारशी विचारात घेऊन राज्यातील आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील श्री साई इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च महाविद्यालयात एम.सी.ए. (MCA) अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची शैक्षणिक संलग्नता नाकारल्याबाबत

**(१२) * २४५७२ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर येथील श्री साई इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च महाविद्यालयात एम.सी.ए. अभ्यासक्रमासाठी १३३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला असताना आवश्यक सेवा-सुविधा उपलब्ध नसल्याच्या कारणास्तव विद्यापीठाने सदर अभ्यासक्रमाची संलग्नता नाकारल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संलग्नता नाकारल्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यापासून वंचित राहावे लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी शासन किंवा संबंधित विद्यापीठाकडून महाविद्यालयास संलग्नता देणे, विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी उपलब्ध करून देणे व त्यांचे शैक्षणिक हक्क सुनिश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.
छत्रपती संभाजीनगर येथील श्री साई इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च महाविद्यालयाच्या एम.सी.ए. अभ्यासक्रमासंदर्भात विद्यापीठामार्फत नियमानुसार तपासणी करण्यात आली. तपासणी समितीच्या अहवालानुसार महाविद्यालयाने सदर अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेल्या काही अटी व सोयी सुविधांची पूर्तता केली नसल्याचे निदर्शनास आले. सदर बाबींचा विचार करून विद्यापीठाने प्रचलित नियमांनुसार संलग्नीकरण नाकारण्याचा निर्णय घेतला आहे.
(२) संलग्नीकरण न झाल्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रक्रियेवर परिणाम झाल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.
(३) सदर प्रकरणी संबंधित संस्थेने व विद्यार्थ्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केल्या असून मा. न्यायालयाने विद्यार्थ्यांना कोणताही तात्काळ किंवा अंतरिम दिलासा दिलेला नाही. तसेच, प्रकरण अंतिम निर्णयासाठी प्रलंबित आहे.
मा. उच्च न्यायालयाने विद्यार्थ्यांना पुन्हा एम.सी.ए. CET परीक्षेस बसण्यास कोणतीही मनाई नसल्याचे स्पष्ट केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यातील कोटगल बॅरेजसाठी भूसंपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(१३) * २५७९३ डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावली (जि.चंद्रपूर) तालुक्यातील कोटगल बॅरेज सुरु झाला तरी भूसंपादित केलेल्या जमिनीचा मोबदला न मिळाल्याने शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आल्याने आदिवासी शेतक-यांनी जन आंदोलन करण्याचा इशारा माहे जानेवारी, २०२६ मध्ये दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पग्रस्त आदिवासींना जमिनीचा मोबदला अद्यापपर्यंत न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून प्रकल्पग्रस्त आदिवासींना तातडीने जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) अंशतः खरे आहे.

जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिनांक २२/१२/२०२५ रोजी शेतकऱ्यांनी निवेदन दिले आहे. कोटगल बॅरेजकरिता एकूण ३८८.५५ हे. खाजगी क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी १३४.७४ हे. क्षेत्राचे संपादन पूर्ण झाले असून उर्वरीत २५३.८१ हे. क्षेत्राचे संपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

त्यापैकी सावली तालुक्यातील एकुण ६ गावांमधील १३७.९४ हे. क्षेत्राचे संपादन प्रस्तावित असून ७९.५४ हे. क्षेत्राचे भुसंपादन पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित ५८.४० हे. क्षेत्राचे मुल्यांकन जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडून प्राप्त असून संपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(२) व (३) एकूण ६ गावापैकी मौजा- चिखली, डोंगरगाव, बोरमाळा व विहीरगाव या ४ गावांच्या प्राप्त मंजूर मुल्यांकनामधील ८४ भूधारक आदिवासी असून त्यांच्या ७/१२ वर "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ३६ व ३६अ ला अधीन (२६७) हस्तांतरणास बंदी अहस्तांतरणीय (१)" असे नमूद होते.

शासन अधिसूचना दिनांक १३ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद (ख) मध्ये नमूद केल्यानुसार आदिवासी व्यक्तींनी धारण केलेल्या जमिनीची विक्री अथवा हस्तांतरण यास पूर्वपरवानगी देण्याचे अधिकार संबंधित महसूल विभागाच्या विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. या खातेदारांच्या जमिनीचे भूसंपादन करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांची पूर्वपरवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२६ रोजी सादर केला असून याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदर परवानगी प्राप्त होताच संपादनाची कार्यवाही पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील समृध्दी महामार्गाच्या कामामुळे निम्न दुधना प्रकल्पाच्या उजव्या कालव्याचे अस्तित्व धोक्यात आल्याबाबत

**(१४) * २८४१४ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील कुंभारी बाजार, डिग्रस, मांडवा, टाकळी कुंभकर्ण परिसरात सुरु असलेल्या समृध्दी महामार्गाच्या कामामुळे निम्न दुधना प्रकल्पाच्या उजव्या कालव्याचे अस्तित्व धोक्यात आले असून सुमारे १० ते १२ किमी कालव्याची दुरवस्था झाल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवजड वाहनांची बेकायदेशीर वाहतूक थांबविण्याचे पाटबंधारे विभागाचे स्पष्ट आदेश असतांनाही बीआयपीएल कंपनीकडून सर्रास नियमभंग केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर नियमांचे व आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

निम्न दुधना प्रकल्पाचे उजव्या कालव्यावरील वितरीका क्रमांक १३ वरील अस्तरीकरणास समृध्दी महामार्गाच्या जालना ते नांदेड या महामार्गाच्या कामामुळे नुकसान झाल्याचे कार्यकारी अभियंता यांना क्षेत्रीय भेटी दरम्यान निदर्शनास आले होते.

(२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

माहे डिसेंबर, २०२५ अखेरीस या महामार्गाचे कामाकरिता निम्न दुधना प्रकल्पाचे उजव्या कालव्यावरील दोन मायनर वरील सर्व्हिस रोडचा अनधिकृत वापर होत असल्याचे निदर्शनास आले.

सदर कालव्याचे सेवा पथ व निरीक्षण पथाचे भराव व कालव्यावरील रस्तापुलावरुन हलकी वाहणे येणे-जाणे होईल, असे गृहीत धरुन संकल्पित करण्यात आले आहे, त्यामुळे सदर सेवा पथ व निरीक्षण पथावरुन अवजड वाहनांची वाहतूक केल्यास कालव्यास व कालव्यावरील बांधकामास नुकसान होण्याची तसेच जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे सदर काम थांबविण्यात आले आहे.

मायनरचे झालेल्या नुकसानीबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना कळविण्यात आले व त्यानुसार संबंधित यंत्रणेमार्फत दुरुस्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इथेनॉल निर्मितीसाठी मका उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव देण्याबाबत

**(१५) * २४९७७ श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या आवाहनानुसार पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी इथेनॉल निर्मितीस चालना देण्यात आली असून यासाठी मका ऐवजी तुकडा तांदूळ वापर करण्यात येत असल्याने मका उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याची माहिती माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या आवाहनानंतर अनेक शेतकऱ्यांनी मका उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ केली असतानाही मका खरेदीसाठी प्रभावी व हमीदार व्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांचा मका खरेदी न होता बाजारात त्याचा दर हमी भावापेक्षा सुमारे ३० टक्क्यांनी कमी मिळत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात इथेनॉल निर्मितीसाठी मका खरेदी करण्यासाठी सुमारे १५ जिल्ह्यांमध्ये खरेदी केंद्रांना मंजुरी देण्यात आली असतानाही प्रत्यक्षात केवळ दोन जिल्ह्यांमध्येच मका खरेदी सुरू असल्यामुळे उर्वरित जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना खरेदीचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मका खरेदी केंद्रांची अंमलबजावणी प्रभावीपणे न झाल्यामुळे शासनाच्या धोरणावर शेतकऱ्यांचा विश्वास डळमळीत होत असून इथेनॉल निर्मितीसाठी आवश्यक कच्चा माल उपलब्ध असूनही शासकीय उद्दिष्टे साध्य होण्यास अडथळे निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, इथेनॉल निर्मितीसाठी मका खरेदीबाबत निर्माण झालेल्या या संपूर्ण परिस्थितीची शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीच्या अनुषंगाने इथेनॉल निर्मितीसाठी मका उत्पादक शेतकऱ्यांकडून मका हमीभावाने व हमीखरेदीने घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ च्या केंद्र सरकारच्या धोरणानुसार दिनांक १ एप्रिल, २०२६ पासून पेट्रोलमध्ये २०% इथेलॉन मिश्रणाचे धोरण लागू केले आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक ०४ जून, २०१८ च्या Biofuel धोरणानुसार ऊसाची मळी, कृषि अवशेष, स्टार्चयुक्त पदार्थ (मका, बटाटा) तसेच मानवी खाण्यास अयोग्य नसलेले गहु, तुकडा तांदुळ इ. पदार्थापासून ईथेनॉलची निर्मिती केली जाते. सदर धोरणान्वये अन्नधान्याच्या अतिरिक्त उत्पादनाचा आढावा घेऊन अतिरिक्त धान्याची ईथेनॉल निर्मितीसाठी रूपांतर करण्याचे धोरण आहे.

केंद्र शासनाच्या अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या दिनांक ०१ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या आदेशान्वये दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२५ ते ३० जून, २०२६ या कालावधीकरीता भारतीय अन्न महामंडळ (FCI) यांच्याकडे उपलब्ध असलेला अतिरिक्त तांदूळ (कमाल ५२ लाख मेट्रीक टन) ईथेनॉल निर्मितीकरीता distilleries ना विक्री करीता मंजूरी दिली आहे.

(२), (३), (४) व (५) किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी करण्यात येणारा मका केंद्र शासनाच्या धोरणानुसार सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत वितरीत केला जातो. प्रस्तुत योजनेंतर्गत इथेनॉल निर्मितीसाठी मका खरेदी केला जात नाही.

सदर योजनेंतर्गत पणन हंगाम २०२५-२६ मध्ये १६ जिल्ह्यांमध्ये ६०,०३५ शेतकऱ्यांनी शासनाकडे मका विक्री करण्यासाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी १४ जिल्ह्यांमध्ये १२,२६९ शेतकऱ्यांकडून, ५,११,५३५.९ क्विंटल मक्याची आधारभूत किंमत रु. २४००/- प्रति क्विंटल याप्रमाणे खरेदी करण्यात आली आहे.

केंद्र शासनाकडून प्रथमत: ६,६०,००० क्विंटल मका खरेदीचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. त्यानंतर केंद्र शासनाकडून अतिरीक्त ५,००,००० क्विंटल मका खरेदीचे उदिष्ट प्राप्त झाले आहे. खरेदीची अंतिम मुदत दिनांक ३१ मार्च, २०२६ पर्यत वाढविण्यात आल्याने मका खरेदी वाढणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी प्राथमिक शाळांच्या मान्यता, मुदतवाढ व अनुदान वितरणाबाबत

**(१६) * २५४२१ श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी प्राथमिक शाळांना प्रथम मिळालेली मान्यता हीच कायमस्वरूपी मान्यता मानण्याची प्रथा राज्यातील इतर भागात अस्तित्वात असताना मुंबईत मात्र केवळ इयत्ता पहिली ते चौथीच्या खाजगी शाळांना दर पाच वर्षांनी मान्यता मुदतवाढ घेण्याची अट लागू करण्यात

आल्याने शाळा व्यवस्थापन व संबंधित प्रशासकीय यंत्रणांवर अनावश्यक ताण निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने यासंदर्भात निर्णय घेतला असतानाही मागील सुमारे १५ वर्षांपासून अनुदानापासून वंचित असलेल्या ९२ खाजगी प्राथमिक शाळांना अद्याप अनुदान मिळालेले नाही तसेच काही शाळांना अनुदानास प्रशासकीय मंजुरी मिळूनही प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यात आलेली नसल्याने मान्यता मुदतवाढी अभावी अडथळे निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरी आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त बाबी लक्षात घेता खाजगी प्राथमिक शाळांना दर पाच वर्षांनी मान्यता मुदतवाढ घेण्याची पद्धत रद्द करण्याबाबत तसेच प्रशासकीय मंजुरी प्राप्त झालेल्या १२ शाळांना अनुदान वितरीत करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे अंशतः खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील खाजगी संस्थांच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या विनाअनुदानित/ अनुदानित प्राथमिक शाळांना (इ.१ ली ते ४ थी) अनुदान सहाय्य संहिता, १९६८ व परिपत्रक दिनांक २०.१०.२००६ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण समितीच्या मंजुरीने प्रथम मान्यता, मान्यता मुदतवाढ आणि अनुदान सहाय्य मंजूर करण्यात येते.
(२) व (३) अंशतः खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ९२ खाजगी प्राथमिक विनाअनुदानित शाळांपैकी ३९ शाळा विविध कारणांमुळे अनुदानास पात्र होत नाहीत. उर्वरित ५३ शाळांपैकी ७ शाळांना अनुदान मंजूर आहे, २४ शाळांच्या अनुदान प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे. ११ शाळांनी अनुदान प्रस्ताव सादर केलेला नाही आणि ११ शाळांचे मान्यता मुदतवाढ प्रस्ताव मंजुरीसाठी कार्यान्वित आहेत. मान्यता मुदतवाढ मिळाल्यानंतर अनुदान प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा रवाळा (ता.वरुड, जि.अमरावती) येथील नागठाणा लघु पाटबंधारे प्रकल्पात बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणी वितरण प्रणालीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१७) * २९२१५ श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा रवाळा (ता.वरुड, जि.अमरावती) येथील नागठाणा-२ लघु पाटबंधारे प्रकल्पात बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणी वितरण प्रणाली राबविण्यात आली असून तो प्रकल्प पथदर्शी (Pilot Project) स्वरूपाचा आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धरणाचे काम सन २०११ मध्ये पूर्ण झाले असून त्यानंतर दरवर्षी जलसाठा निर्माण होत असून सदर योजनेपैकी सुमारे ८० टक्के योजना व्यवस्थित कार्यान्वित नसून संबंधित कंत्राटदार कंपनीने कालमर्यादेत काम पूर्ण न केल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंत्राटदार कंपनीने शासनाची दिशाभूल करून निकृष्ट दर्जाचे काम करून शासनाकडून कोट्यवधी रुपये वसूल केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त नागठाणा २ लघु पाटबंधारे प्रकल्प येथील गुरुत्वाकर्षण आधारित बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणी वितरण प्रणाली प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी व चुडामणी वापर संस्था, शेंदूरजनाघाट यांनी संबंधित विभागाला वारंवार निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे, त्यानुषंगाने संबंधित कंत्राटदार कंपनीविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली तसेच शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
१) सदर धरणाचे काम सन-२०११ मध्ये पूर्ण करण्यात आले असून, सन २०११ पासून प्रकल्पामध्ये पाणीसाठा करण्यात येत आहे.
२) प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांकडून पारंपरिक कालवा प्रणाली ऐवजी पाईपलाईनद्वारे सिंचन करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने सन-२०१५ मध्ये बंदिस्त वितरण प्रणालीचे काम सुरु करण्यात आले असून सदरची कामे भौतिकदृष्ट्या सन-२०१८ मध्ये पूर्ण करण्यात आली.
३) प्रकल्पाचे लाभक्षेत्र ४ झोन मध्ये विभाजित करण्यात आलेले असून प्रत्यक्षात चाचणी दरम्यान केवळ झोन क्र.२ व झोन क्र.४ बाबतची चाचणी यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली असून, सदर झोन मध्ये पूर्ण (२५३ हेक्टर) सिंचनक्षमता निर्माण करण्यात आली व सदरचे क्षेत्र पाणीवापर संस्थेस हस्तांतरित करण्यात आले आहे. तसेच, झोन क्र.१ व झोन क्र.३ मध्ये तांत्रिक अडचणी निदर्शनास आल्यामुळे, सदर क्षेत्रामध्ये असलेल्या अडचणी दूर करणेबाबत सद्य:स्थितीत कंत्राटदाराकडून कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) हे खरे नाही.
सदर कामाची मूळ निविदा किंमत रु.६.८४ कोटी असून वितरण प्रणालीच्या दुरुस्तीच्या कामास झालेल्या विलंबामुळे कंत्राटदारास दंड आकारण्यात आलेला आहे. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार लाभक्षेत्र पाणी वापर संस्थेस हस्तांतरण करणे व देखभाल दुरुस्तीची कामे पूर्ण न केल्यामुळे सदर अभिकरणास उर्वरित देयक अदा करण्यात आलेले नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५) वितरण प्रणालीच्या दुरुस्तीच्या कामास झालेल्या विलंबामुळे कंत्राटदारास दंड आकारण्यात आला आहे व झालेल्या कामाचे देयक प्रलंबित ठेवले आहे. कंत्राटदारामार्फत अडचणी दूर करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) विद्यापीठातील जातीभेदाबाबत केलेल्या नव्या नियमावलीबाबत

**(१८) * २९२३४ श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठातील जाती भेदास प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) अलीकडेच नवीन नियमावली प्रसृत केली असून सदर नियमावलीतील जातीभेदाची व्याख्या संकुचित स्वरूपाची असून त्यामुळे काही प्रवर्गांना संस्थात्मक संरक्षणापासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप करीत ही नियमावली तातडीने रद्द करण्याची मागणी विविध संघटना/घटकांकडून शासनाकडे करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियमावली संदिग्ध स्वरूपाची असून तिचा गैरवापर होण्याची शक्यता असल्याचे निरीक्षण नोंदवत संबंधित न्यायालयाने निर्णय देऊन या नियमावलीस स्थगिती दिल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर न्यायालयीन स्थगितीच्या पार्श्वभूमीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :**

(१) व (२) सदर प्रश्न केंद्र शासनाच्या अखत्यारीतील विद्यापीठ अनुदान आयोगाशी संबंधित आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीबाबतच्या तक्रारी, त्यानुषंगाने उद्भवणारी न्यायालयीन प्रकरणे हे सर्वस्वी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अखत्यारीतील बाबी आहेत. राज्य शासनाचा या विषयाशी थेट संबंध नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि. पालघर) येथील चप्पलपाडा येथील विद्यार्थ्यांच्या गाडी अपघाताबाबत

**(१९) * २८७०६ श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील चप्पलपाडा येथील शालेय विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेसाठी केंद्र शाळा, मोखाडा येथे घेऊन जात असताना पिकअप वाहनाचा अपघात होऊन सुमारे १४ ते १५ विद्यार्थी गंभीर जखमी झाल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेच्या वेळी विद्यार्थ्यांसोबत एकही शिक्षक अथवा जबाबदार शालेय कर्मचारी उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरेआहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित शिक्षक अथवा बेजबाबदार शालेय कर्मचारी यांच्याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे
(३), (४) व (५) संबंधीत मुख्य शिक्षकावर प्रशासकीय कारवाई करण्यात आलेली आहे. तथापि, या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात येत आहे.

-----------------

## काजू प्रक्रिया उद्योगास ५ टक्के कर परतावा योजना लागू करण्याबाबत

**(२०) * २९२९४ श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काजू प्रक्रिया उद्योगासंदर्भात दिनांक २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यादरम्यान शासनस्तरावर झालेल्या बैठकीत विविध सकारात्मक निर्णय जाहीर करण्यात आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बैठकीत काजू प्रक्रिया उद्योगास GST च्या बदल्यात २.५ टक्के SGST प्रोत्साहन अनुदान व २.५ टक्के राज्यस्तरीय प्रोत्साहन असा एकूण ५ टक्के कर परतावा देण्याचा निर्णय झाल्याचे जाहीर करण्यात आले, मात्र सदर निर्णयाची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,
(३) तसेच, GST करप्रणालीपूर्वी काजू प्रक्रिया उद्योगासाठी लागणाऱ्या कच्च्या मालावर म्हणजेच काजू बी यावर कोणताही कर नव्हता, मात्र GST करप्रणाली लागू झाल्यानंतर काजू बी वर ५ टक्के GST तसेच त्यापासून प्रक्रिया केलेल्या काजूगरावरही ५ टक्के GST आकारला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, GST करप्रणाली लागू झाल्यानंतर सन २०२० पासून काजू प्रक्रिया उद्योगास फक्त २.५ टक्के कर परतावा मिळत असून यापूर्वी VAT करप्रणालीत एकूण ५ टक्के कर परतावा मिळत होता, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त बैठकीत काजू प्रक्रिया उद्योगास SGST परताव्यासोबत उर्वरित CGST च्या बदल्यात अनुदान देऊन एकूण ५ टक्के कर परतावा देण्याचा तसेच त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाला होता, मात्र निर्णय होऊन दोन वर्षांचा कालावधी लोटूनही ५ टक्के परतावा व आवश्यक निधी उपलब्ध न झाल्यामुळे उद्योगास अपेक्षित लाभ मिळाला नसून परिणामी काजू प्रक्रिया उद्योग अडचणीत येवून अनेक उद्योग बंद पडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, काजू प्रक्रिया उद्योगासाठी उर्वरित २.५ टक्के CGST च्या बदल्यात अनुदान देण्यासाठी माहे एप्रिल २०२० पासून दरवर्षी रुपये ५० कोटी निधीची तरतूद करण्याचा तसेच काजू प्रक्रिया उद्योगास एकूण ५ टक्के कर परतावा योजना लागू करून त्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) काजू पिकाच्या सर्वकष विकासाच्या धोरणातून काजू उद्योगाचा विकास साधण्याच्या दृष्टीने काजू उद्योगाच्या SGST परताव्यासाठी निधी उपलब्ध करणे व इतर विषयाच्या अनुषंगाने तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी बैठक झाली होती.

(२), (३), (४), (५), (६) व (७) उद्योग विभागाच्या दिनांक १५ जुलै, २०१० च्या शासन निर्णयानुसार राज्यामध्ये उत्पादीत व प्रक्रिया केलेल्या काजूपैकी राज्यामध्ये अंतिमत: विक्री झालेल्या काजूच्या विक्रीवर देय असलेल्या ५% मूल्यवर्धित कर भरल्यानंतर सदर कराची रक्कम प्रोत्साहन अनुदान म्हणून संबंधित घटकांना प्रदान करण्यात येत होती.

तथापि, दिनांक ०१ जुलै, २०१७ पासून मूल्यवर्धित कराऐवजी वस्तू व सेवा कर आकारण्याची (GST) नवीन कार्यप्रणाली सुरु झाल्याने, सदर कर रचनेच्या पार्श्वभूमीवर दिनांक ०२ डिसेंबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये प्रोत्साहन अनुदान वाटपाच्या कार्यप्रणालीत सुधारणा करण्यात आली आहे.

तत्कालीन मा.उप मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या बैठकीत काजू प्रक्रिया उद्योग घटकांच्या अडचणी विचारात घेता, राज्यातील काजू प्रक्रिया उद्योग घटकाकडून राज्यात होणाऱ्या काजूच्या विक्रीवर देय असलेला संपूर्ण ५ टक्के (२.५% SGST+ २.५% CGST) एवढ्या रकमेचा काजू प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन अनुदान परतावा मंजूर करण्याबाबत प्रस्ताव उद्योग विभागाने मा.मंत्रीमंडळासमोर सादर करावा असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार राज्यामध्ये केलेल्या काजूच्या विक्रीवर संपूर्ण ५ टक्के (२.५ टक्के SGST +२.५ टक्के CGST) एवढया रकमेच्या काजू प्रकिया उद्योगांना प्रोत्साहन अनुदान परतावा प्रोत्साहन म्हणून मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव विकास आयुक्त, उद्योग संचालनालय यांचेकडून दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ रोजी व सुधारित प्रस्ताव दिनांक ०२ डिसेंबर, २०२४ रोजी सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने उद्योग उर्जा विभागाने सादर केलेल्या मंत्रिमंडळ प्रस्तावास मा.मंत्री (उद्योग) यांची दिनांक २० मे, २०२५ रोजी मान्यता प्राप्त झाली असून, सदर मंत्रिमंडळ प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात आलेला असून तो विचारार्थ आहे.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये विज्ञान भवन / विज्ञान केंद्र उभारण्याबाबत

**(२१) * २३५३० श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, खामगाव, शेगाव, मलकापूर, चिखली, मेहकर, लोणार, नांदुरा, मोताळा, जळगाव जामोद व संग्रामपूर (जि.बुलढाणा) तालुक्यांमध्ये विज्ञान भवन / विज्ञान केंद्र उभारणीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आले असून त्यापैकी काही ठिकाणी प्रस्ताव मंजूर होऊनही प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील खामगाव, शेगाव, मलकापूर, चिखली व मेहकर येथे विज्ञान केंद्र उभारणीचे प्रस्ताव मंजूर असतानाही निधीअभावी अथवा प्रशासकीय विलंबामुळे कामे अद्याप सुरू न झाल्याने विद्यार्थ्यांना शास्त्रीय प्रयोग, प्रात्यक्षिके व विज्ञानविषयक प्रदर्शनांपासून वंचित रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, देऊळगाव राजा, सिंदखेड राजा, लोणार, नांदुरा व मोताळा या तालुक्यांमध्ये विज्ञान भवन उभारणीसाठी आवश्यक जागा, आराखडा व तांत्रिक मान्यता उपलब्ध असूनही प्रत्यक्ष बांधकाम झाले नसल्याने शासनाच्या निर्णयांची अंमलबजावणी अपुरी राहिल्याचे तसेच यामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जळगाव जामोद व संग्रामपूर तालुक्यांमध्ये विज्ञान केंद्र उभारणीसाठी मंजूर निधी किती असून आतापर्यंत प्रत्यक्ष किती निधी खर्च करण्यात आला आहे तसेच उर्वरित निधी वितरणाची सद्य:स्थिती काय आहे व संबंधित कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने निश्चित कालमर्यादा ठरविण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे,
(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यात मंजूर झालेल्या सर्व विज्ञान भवन व विज्ञान केंद्रांची कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मा. श्री. मनोज कायंदे व मा. श्रीमती श्वेताताई महाले यांच्या कडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शाश्वत विकास ध्येय या योजनेंतर्गत सुसज्ज मिनी प्रयोगशाळांचे बांधकाम करण्यासाठी सिंदखेड राजा व चिखली या दोन तालुक्यांमध्ये प्रत्येकी १० अशा एकूण २० शाळांसाठी शिफारसपत्र प्राप्त झालेली आहेत व त्यास अनुसरुन जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या प्रशासकीय मान्यतेने २० पैकी १२ शाळांमध्ये मीनी प्रयोग शाळा स्थापन करण्यासाठी या संबंधीच्या कामांसाठी अंदाजे रुपये २३९.९१ लक्ष निधीस जिल्हा वार्षिक योजना २०२५-२०२६ मध्ये लेखाशीर्ष अंतर्गत मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या प्रशासकीय मान्यतेने २० पैकी १२ शाळांमध्ये मीनी प्रयोग शाळा स्थापन करण्यासाठी या संबंधीच्या कामासांठी अंदाजे रुपये २३९.९१ लक्ष निधीस जिल्हा वार्षिक योजना २०२५-२०२६ मध्ये लेखाशीर्ष अंतर्गत मान्यता देण्यात आली आहे. मान्यता प्राप्त निधीपैकी रुपये १४४ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर कामांसाठी बांधकाम विभाग, जि.प. बुलढाणा यांना अंमलबजावणी यंत्रणा म्हणून निश्चित करण्यात आले असून सदरचे काम बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे व या कामांच्या निविदा प्रक्रियेची कामे सद्य:स्थितीत सुरु आहेत. तथापि, विभागाकडून प्रस्तुत प्रकरणी कुठलाही विलंब झालेला नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील माणेकनगर माडगी येथील श्रीनबाई नेत्रवाला शाळेत थकीत शुल्कामुळे विद्यार्थ्याला प्रवेश नाकारल्याबाबत

**(२२) * २६५०८ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यातील माणेकनगर माडगी येथील श्रीनबाई नेत्रवाला शाळेमधील कु.हिमांशू सुशील सेलोकर (वय १४) या विद्यार्थ्यासह अन्य विद्यार्थ्यांचे शुल्क थकीत असल्याने तसेच, सदर

विद्यार्थ्याचे चालू शैक्षणिक वर्षातील एकूण शिक्षण शुल्क रुपये ३८,००० असून त्यापैकी रुपये १०,००० जमा करण्यात आले असल्याचे दिनांक ०३ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित शुल्क भरण्यास विलंब होत असल्याच्या कारणावरून संबंधित शाळेने कु.हिमांशू सेलोकर या विद्यार्थ्यास शाळेत येण्यास मज्जाव केला असल्याची बाब विद्यार्थ्याच्या वडिलांनी दिनांक ०३ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान कळविल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकारामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून शिक्षणाचा हक्क अधिनियमातील (RTE) तरतुदीनुसार संबंधित शाळेवर कठोर कारवाई करण्याची मागणी पालकांकडून तसेच स्वराज्य युवा एकता फाऊंडेशनच्या संस्थापकांकडून करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सबंधित शाळेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, भविष्यात शुल्क थकबाकीच्या कारणावरून कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण खंडित होऊ नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे. याबाबत अध्यक्ष, स्वराज्य युवा एकता फाऊंडेशन यांनी दिनांक ०७ जानेवारी, २०२६ रोजी पंचायत समितीस पत्र दिले.
(३), (४) व (५) सदर विद्यार्थी दिनांक ०६ व ०७ जानेवारी, २०२६ रोजी शाळेत गैरहजर होता. त्यानंतर सदर विद्यार्थी नियमित शाळेत येत आहे. सदर विद्यार्थ्याच्या पालकांनी उर्वरीत शुल्क रु.३०८८०/- दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ व दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ रोजी (१४००० + १६८८०) भरले आहे.
(६) विद्यार्थ्याने शाळेची फी अथवा प्रलंबित फी भरली नाही म्हणून शाळा व्यवस्थापनाने अशा कोणत्याही विद्यार्थ्याला प्रत्यक्ष शिक्षण घेण्यास अथवा परीक्षेत बसण्यास प्रतिबंध करण्यात येऊ नये किंवा अशा विद्यार्थ्यांचा निकाल देखील रोखून धरण्यात येऊ नये अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील सेल्फ फायनान्स शाळांमधील बेकायदेशीर माध्यमिक वर्ग, बनावट व अप्रशिक्षित शिक्षक भरती व अवाजवी शुल्क वसुलीबाबत

**(२३) * २९०६८ श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील काही सेल्फ फायनान्स शाळांमध्ये प्राथमिक शिक्षण विभागाच्या अखत्यारीत असताना माध्यमिक वर्ग बेकायदेशीररीत्या सुरू करण्यात आले असून त्या ठिकाणी बनावट व अप्रशिक्षित शिक्षकांची भरती केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालकांकडून अवाजवी व बेकायदेशीर शुल्क आकारले जात असून याबाबत संबंधित विभागामार्फत नियमित तपासणी व कारवाई होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मागील तीन वर्षांच्या कालावधीत लेखाधिकार / लेखापरीक्षण तपासणी पथक, शिक्षण खाते, सोलापूर यांच्यामार्फत अशा शाळांची तपासणी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, सदर शाळांमार्फत पालकांकडून अवाजवी व बेकायदेशीर शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशतः खरे आहे.

सोलापूर महानगरपालिका हद्दीतील दोन प्राथमिक शाळांमध्ये माध्यमिकचे वर्ग अनधिकृतपणे सुरू असल्याची तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने शाळांना नोटीस देण्यात आली होती.

त्यापैकी एका शाळेत अनधिकृत वर्ग सुरु नसल्याचे आढळून आले, तर अन्य एका शाळेतील अनधिकृत माध्यमिक वर्ग बंद करण्यात आले आहेत. तसेच, सदर अनधिकृत माध्यमिक वर्गांमधील विद्यार्थ्यांचे समायोजन करण्यात आले आहे. तसेच, या शाळांमध्ये तोतया व अप्रशिक्षित शिक्षक असल्याचे आढळून आलेले नाही.
(२) व (३) अशी तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) व (५) स्वयंअर्थसहाय्यित शाळांचे लेखापरीक्षण हे शिक्षण विभाग यांचेमार्फत केले जात नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यात कमी पटसंख्या असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांचे एकत्रीकरण (समोशाळा) करण्याबाबत

**(२४) * २९५५५ श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यात पटसंख्या कमी असलेल्या व एकाच परिसरात असणाऱ्या दोन किंवा अधिक जिल्हा परिषदेच्या शाळा एकत्रित करून ‘समोशाळा’ तयार करण्याची अंमलबजावणी करण्यात येत असून त्याअंतर्गत जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची संख्या कमी होणार असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा केवळ पटसंख्येच्या आधारे कमी न करता त्या शाळा पूर्वीप्रमाणे सुरू ठेवून वर्गनिहाय शिक्षक तसेच क्रीडा शिक्षक उपलब्ध करून देण्यात आल्यास जिल्ह्यातील गरीब व गरजू मुला-मुलींचे शिक्षण सुरळीतपणे पूर्ण होऊ शकते या दृष्टीने राज्यभरातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा पूर्ववत सुरू ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील शासकीय वसतिगृहांच्या अपुऱ्या क्षमतेमुळे उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींबाबत

**(२५) * २६८४९ श्रीमती सई डहाके (कारंजा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या विविध भागांतील विद्यार्थ्यांना मुंबईतील उच्च व प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांमध्ये वैद्यकीय, एमबीए, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, विधी व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळूनही मुंबई शहरात शासकीय वसतिगृहांची संख्या व प्रवेश क्षमता अत्यंत मर्यादित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्थिक अडचणीमुळे खाजगी निवासाची सोय न होऊ शकल्याने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये सुमारे ११८ विद्यार्थी-विद्यार्थिनींना प्रवेश मिळूनही अभ्यासक्रम सोडावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील शासकीय वसतिगृहांची एकूण संख्या, त्यांची प्रवेश/आसन क्षमता तसेच विविध उच्च शिक्षण अभ्यासक्रमनिहाय प्रवेशासंबंधी स्पष्ट व निश्चित धोरण नसल्याने वसतिगृह प्रवेश प्रक्रियेत दरवर्षी गोंधळ व गैरव्यवहार होत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त होत असून त्यांची अपेक्षित दखल घेतली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई शहरातील सर्व शासकीय वसतिगृहांची एकूण क्षमता विचारात घेऊन उच्च शिक्षण अभ्यासक्रमनिहाय तसेच विविध प्रवर्गनिहाय आरक्षित प्रवेश संख्या निश्चित करून ती सार्वजनिकरीत्या जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) मुंबईमध्ये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी ०४ शासकीय वसतिगृहे उपलब्ध असून या वसतिगृहांची प्रवेशक्षमता १२०० विद्यार्थी एवढी आहे.

शासन ज्ञापन दिनांक २७.१०.२०२३ अन्वये तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय तंत्र निकेतन, मुंबई या संस्थेसाठी ५०१ विद्यार्थी एवढ्या प्रवेश क्षमतेचे वसतिगृह बांधकाम करणे नियोजित आहे.

सन २०२४ या वर्षापासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई सुरु झालेले असून या महाविद्यालयासाठी १०० एवढ्या विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह उपलब्ध आहे. तसेच, ६०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या वसतिगृह बांधकामास शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण विभाग दिनांक ३०.०७.२०२५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सर ज.जी. समूह रुग्णालये व ग्रँट शासकिय महाविद्यालय, मुंबई या महाविद्यालयासाठी २२५० खोल्यांचे सुसज्ज वसतिगृहाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागास सादर करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.

उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी वसतिगृह प्रवेशा अभावी अथवा निवासाची सोय न झाल्याने अभ्यासक्रम सोडावा लागल्याची तक्रार प्राप्त नाही.
(३) व (४) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेशित आणि शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासन निर्णय दिनांक २७.०६.२०२५ अन्वये सविस्तर नियमावली निर्गमित करण्यात आलेली आहे. या नियमावली अन्वये महाविद्यालये/संस्थानिहाय आरक्षित जागा, वैधानिक आरक्षण, दिव्यांग आरक्षण, अनाथ आरक्षण, स्थाननिहाय आरक्षण, प्रवेश पात्रता, वयोमर्यादा व शुल्क इत्यादी बाबी विहित करण्यात आलेल्या आहेत. यास्तव प्रवेश प्रक्रियेत गोंधळ अथवा गैरव्यवहार होत असल्याची तक्रार प्राप्त नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यासह राज्यातील जिल्हा परिषद शाळांचे थकीत वीज देयके अदा करणेसह मासिक वीज देयके भरण्यासाठी तरतुद करणेबाबत

**(२६) * २९५४२ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये वीज देयके थकीत असल्यामुळे महावितरण कंपनीकडून सदर शाळांची वीज जोडणी खंडित करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषद शाळांना मासिक वीज देयके भरण्यासाठी कोणतीही स्वतंत्र आर्थिक तरतूद उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यासह राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांची थकीत वीज देयके अदा करण्याबाबत तसेच भविष्यात जिल्हा परिषद शाळांना मासिक वीज देयके भरण्यासाठी स्वतंत्र तरतूद करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.
चंद्रपूर जिल्हा परिषदे अंतर्गत एकूण १५४६ शाळांपैकी ६८ शाळांचा वीज देयके थकीत असल्यामुळे वीज पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राज्यातील जिल्हा परिषद शाळांचे नियमित व थकीत विद्युत देयके भरण्यासाठी रु.१८.४३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी चंद्रपूर जिल्ह्याकरीता रु. २४ लाख ३६ हजार इतका निधी वीज बिलाच्या अदायगी करीता वितरीत करण्यात आला आहे. यासोबतच समग्र शिक्षा अंतर्गत संयुक्त शाळा अनुदानातून वीज देयके भरण्याची कार्यवाही करण्यात येते.
तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांची विद्युत देयके वेळेवर अदा करण्यासाठी संयुक्त बिलिंग (Composite Billing) पद्धतीची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये मूलभूत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२७) * २६७९७ श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या युडायस प्लस सन २०२४-२५ या अहवालानुसार राज्यातील २५,९५८ शाळांमध्ये अध्यापनासाठी संगणक सुविधा नाही, ३०,१६६ शाळांमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही तसेच, ५,५६७ शाळांमध्ये अद्याप वीजपुरवठाच नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, ६,९६४ शाळांमध्ये मुलींसाठी व १०,१८९ शाळांमध्ये मुलांसाठी आवश्यक स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध नसल्याची बाबही निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अनेक शाळांमध्ये क्रीडांगण, ग्रंथालय, डिजिटल ग्रंथालय, परसबाग, सौर ऊर्जा पॅनेल यांसारख्या मूलभूत व पूरक सुविधा उपलब्ध नसल्याचेही अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळून आलेल्या शाळा/प्राधिकरणांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, उक्त शाळांमध्ये आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये समग्र शिक्षा योजनेच्या माध्यमातून स्वच्छतागृह उभारण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

समग्र शिक्षाअंतर्गत अति दुर्गम भागातील ज्या शाळांमध्ये विद्युत सुविधा उपलब्ध नाही, अशा शाळांमध्ये सौर ऊर्जा संच मंजूर करण्यात आलेले आहेत. तसेच, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शैक्षणिक पूरक साहित्य व डिजिटल ग्रंथालय उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४), (५) व (६) सर्व शाळांमध्ये दिनांक ०८ मार्च, २०२६ पूर्वी मुलींकरिता स्वतंत्र स्वच्छतागृह उभारण्याबाबत सर्व आयुक्त, महानगरपालिका व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयाच्या स्तरावरून सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हा स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूक प्रक्रियेत झालेला अपहार

**(२८) * २४०१८ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीत मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी जिल्ह्यातील ९ तालुक्यांमध्ये २३ बोगस सहकारी संस्थांची नोंदणी झाल्याची बाब माहे, डिसेंबर २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधारकार्ड, पॅन कार्ड आणि पत्त्यांच्या पुराव्याशिवाय या संस्थांची नोंदणी करण्यात आली असून सहकार विभागाच्या नियमांना पायदळी तुडवून या संस्थांना बेकायदेशीरपणे कर्ज वाटप करून बँकेच्या निधीचा अपहार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रुपये ३२०० कोटी इतक्या रक्कमेची उलाढाल असलेल्या या बँकेवर वर्चस्व मिळविण्यासाठी केवळ कागदोपत्री अस्तित्वात असलेल्या संस्थांना केवायसी (KYC) प्रक्रिया पूर्ण न करताच नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दोन वर्षात दुय्यम निबंधक कार्यालयामार्फत या संस्थांची नोंदणी प्रक्रिया घाईघाईने पूर्ण करण्यात आली असून प्रत्यक्षात त्या पत्त्यांवर एकही संस्था अस्तित्वात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) श्री. दिलीप भाऊसाहेब बनकर पाटील, रा. अंबेलोहळ, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी छत्रपती संभाजीनगर तालुक्यात २३ व सिल्लोड तालुक्यात १३ सहकारी संस्थांची बोगस नोंदणी झाल्याबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयास दिनांक १० सप्टेंबर, २०२५ रोजी तक्रार दाखल केली आहे.

(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

उपरोक्त ३६ संस्थांपैकी ०३ संस्थांमध्ये प्रवर्तक मंडळाचे आधार कार्ड आढळून आले आहेत. तथापि ३३ संस्थांचे आधार कार्ड आढळून आलेले नाहीत. या ३६ संस्थांपैकी ०६ संस्था नोंदणीकृत पत्त्यावर दिसून आलेल्या नाहीत.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या धोरणानुसार व संचालक मंडळाच्या ठरावान्वये या ३६ संस्थांना बँकेने एकूण रु. १०.७५ लाख कर्ज मंजुर केले असून यापैकी केवळ ४ संस्थांना रु. १.३० लाख कर्ज वितरित करण्यात आले आहे. उपरोक्तप्रमाणे मंजूर व वाटप केलेले कर्ज नाबार्डच्या धोरणानुसार झाले किंवा कसे यांची चौकशी करून अहवाल सादर करणेबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजी नगर यांनी जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांना दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ च्या पत्रान्वये निर्देश दिले आहेत.

सन २०२४-२५ मध्ये बँकेची एकूण उलाढाल रु. ३९४८.३० कोटी आहे. श्री. दिलीप बनकर यांच्या तक्रार अर्जात नमूद केलेल्या एकूण ३६ संस्थांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१-अ व नियम १८-क अन्वये कारवाई करण्याबाबत विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या स्तरावर सुनावणी सुरु आहे.

उपरोक्त ३६ संस्थापैकी ०६ संस्थांची दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी कलम २१-अ नुसार सुनावणी घेण्यात आली आहे. या सुनावणीत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या अहवालानुसार सदर सहा संस्था नोंदणीकृत पत्त्यावर आढळून आल्या नाहीत. उर्वरित ३० संस्थांबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या स्तरावर दिनांक ४ मार्च, २०२६ ते दिनांक ०६ मार्च, २०२६ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे.
(५) उक्त नमूद एकूण ३६ संस्थांची कलम २१-अ नुसार विनोंदणीबाबत सुनावणी सुरु आहे. या सुनावणी अंती उचित निर्णय घेण्यात येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व पूर्व-प्राथमिक शाळा शासनाच्या अखत्यारित आणण्याकरिता कायदा करण्याबाबत

**(२९) * २९४२० डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व पूर्व-प्राथमिक शाळा शासनाच्या अखत्यारित आणण्याबाबत गृह व शालेय शिक्षण राज्यमंत्री यांनी दिनांक २४ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान घोषणा केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घोषणेनुसार पूर्व-प्राथमिक शाळा शासनाच्या अखत्यारित आणण्यासाठी स्वतंत्र कायदा तयार करण्यात आला आहे काय, तसेच त्या कायद्याचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, सदर कायदा दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजीपासून सुरू होणाऱ्या राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर करण्याचा शासनाचा विचार असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) राज्यात कार्यरत असलेल्या आणि नव्याने सुरू करण्यात येत असलेल्या खाजगी बालवाटिका (खाजगी पूर्व प्राथमिक शाळा) यासंदर्भात कायदा तयार करण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरू असून या कायद्यामध्ये खाजगी बालवाटिकांची नोंदणी, या बालवाटिकांनी अवलंबावयाचा अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांची सुरक्षा, इत्यादी संदर्भातील तरतुदींचा समावेश करण्यात येणार आहे.
(३) कायद्याचे प्रारूप अंतिम झाल्यानंतर विधानमंडळाच्या मान्यतेकरिता सादर करण्यात येईल.

-----------------

## हिंगोली (जि. हिंगोली) येथील आदर्श एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयात अनुसूचित जातीच्या विद्यार्थिनींना हेतुपुरस्सर अनुत्तीर्ण केलेल्या तक्रारीच्या चौकशीबाबत

**(३०) * २८५०१ श्रीमती सई डहाके (कारंजा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली (जि.हिंगोली) येथील आदर्श एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयात एम.एससी. (प्राणीशास्त्र/Zoology) द्वितीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या तीन अनुसूचित जातीच्या विद्यार्थिनींना मॉडरेटर प्रा. डॉ. पी. पी. जोशी यांनी पूर्वग्रहदूषित भावनेतून अनुत्तीर्ण केल्याची बाब दिनांक २६ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मॉडरेटर प्रा. डॉ. पी. पी. जोशी यांच्याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या कथित पूर्वग्रहदूषित वागणुकीस सामोरे जावे लागू नये, त्यांच्या शैक्षणिक हक्कांचे संरक्षण होण्यासाठी स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा उभारणे तसेच विद्यार्थिनींवरील कथित अन्याय दूर करण्याच्या दृष्टीने संबंधित विद्यापीठाने त्यांना एम.एससी. द्वितीय वर्षात उत्तीर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) सदर प्रकरणी विद्यार्थीनींकडून मूल्यमापन प्रक्रियेबाबत तक्रार प्राप्त झाली होती.

(२) व (३) तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित विद्यापीठाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार त्रिसदस्यीय समिती गठित करून चौकशी केली. समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार विद्यापीठाने Common ordinances on examination matters, July, २००२ मधील तरतुदींच्या आधारे संबंधित प्राध्यापकांविरूध्द प्रशासकीय व शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याचे निर्देश महाविद्यालयास देण्यात आले आहेत.

(४) प्रस्तुत विद्यापीठाने गठीत केलेल्या चौकशी समितीच्या अहवालातील शिफारशीप्रमाणे संबंधीत तक्रारदार विद्यार्थीनींचे नियमनामध्ये (Moderation) दिलेले गुण रद्द करुन पहिल्या मुल्यांकनामध्ये (Assessment) देण्यात आलेले गुण कायम ठेवण्यात आले असून सदर विद्यार्थीनी त्यात उत्तीर्ण झालेल्या आहेत. त्यानुषंगाने त्यांना सुधारीत गुणपत्रके देण्यात आलेली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंप्री मोडक (ता.कारंजा, जि.वाशिम) धरण प्रकल्प रद्द करणेबाबत

**(३१) * २८७७५ श्रीमती सई डहाके (कारंजा) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंप्री मोडक (ता.कारंजा, जि.वाशिम) ग्रा.पं.ने ठराव घेऊन पिंप्री मोडक धरण रद्द न केल्यास सामूहिक

आत्महत्येचा इशारा निवेदनाच्या माध्यमातून शासनाला दिल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२६ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनीचे दर, मोजणी नोटीसा, विहिरी, बागायती झाडे याबाबत संबंधित शेतकऱ्यांना अंधारात ठेवून परस्पर सर्वेक्षण करुन शासन हा प्रकल्प लादत असल्याने तो त्वरीत रद्द न केल्यास सामूहिक आत्महत्या करण्याचा इशारा देणारे सुमारे १५० धरणग्रस्तांच्या सह्यांचे निवेदन जिल्हाधिकारी वाशिम, उप विभागीय अधिकारी कारंजा, लघु पाटबंधारे, कारंजा व मंगरूळपीर यांना दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावित पिंप्री मोडक धरणाची भिंत गावापासून अवघ्या ४०० मीटर अंतरावर राहणार असल्याने गावाची सुरक्षा व २ किमी अंतरावर आधीच असलेल्या हिवरा लाहे धरणामुळे पिंप्री मोडक येथील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी ओलिताखाली असताना कोट्यवधी रूपये खर्चून पुन्हा नव्याने पिंप्री मोडक धरण कशासाठी असा सवाल धरणग्रस्तांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने पिंप्री मोडक धरणाची व्यावहारिक आवश्यकता तपासून हा प्रकल्प रद्द करणे वा त्याचे महत्व संबंधित ग्रामस्थ व संभाव्य बाधितांना पारदर्शीपणे पटवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

पिंप्री मोडक प्रकल्प रद्द न केल्यास सामूहिक आत्महत्या करण्याचा इशारा देणारे सुमारे १५० धरणग्रस्तांच्या सह्यांचे निवेदन जिल्हाधिकारी वाशिम, उप विभागीय अधिकारी कारंजा, लघु पाटबंधारे, कारंजा व मंगरूळपीर यांना दिले आहे.

पिंप्री मोडक बृ.ल.पा. योजनेचा धरणभिंतीकरीता संपादित करावयाच्या मौजे पिंप्री मोडक येथील ६२.५८ हेक्टर खाजगी जमिनीच्या भूसंपादन प्रस्तावाच्या संयुक्त मोजणीची नोटीस उप अधीक्षक, भूमीलेख, कारंजा यांनी दिनांक २२ मे, २०२५ रोजी काढली. सदर नोटीस दिनांक २६ मे, २०२५ ते दिनांक २८ मे, २०२५ या कालावधीत संबंधित भूधारकांस देण्यात आल्या आहे. तसेच शेतीमधील विहिरी व बागायती झाडे यांची मोजमापे संबंधित भूधारकांसमवेत छायाचित्रे व व्हिडीओग्राफीसह घेण्यात आली आहेत. ही मोजमापे संबंधित शेतकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये नोंदविण्यात आलेली असून मोजमापांवर त्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या आहेत.

तसेच विविध विभागांमार्फत मूल्यांकन प्राप्त झाल्यावर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कलम-३७ अन्वये प्रारुप निवाडा जाहीर करून भूधारकांस प्राप्त होणारा मोबदला जाहीर करण्यात येईल.

(३) हे अशंत: खरे आहे.

पिंप्री मोडक धरणाच्या मुख्य भिंतीचे संकल्पन करताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे पालन करण्यात आलेले आहे. तसेच पूर नियंत्रणाकरिता पुच्छ कालव्याचे सरेखनासह आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या असल्यामुळे पिंपरी मोडक गावास कोणताही धोका संभवत नाही.

हिवरा लाहे प्रकल्पाचे लाभक्षेत्र हे पिंप्री मोडक प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात अंतर्भूत होत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) पिंप्री मोडक प्रकल्पाची साठवण क्षमता ४.६४ दलघमी असून प्रकल्पाव्दारे एकूण ५ गावांमधील ८६५ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पामध्ये ०.५७३ दलघमी पाणी पिण्याकरिता तरतूद असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. तसेच सदर प्रकल्पामुळे भूगर्भातील पाणीसाठा वाढण्यास मदत होऊन परिसरातील शेतकरी व गावांना त्याचा अप्रत्यक्ष लाभ होईल. सदर प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरत आहे. तथापि, संबंधित ग्रामस्थ व संभाव्य बाधितांच्या निवेदनाच्या अनुषंगाने तपासणी करुन अहवाल देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.